दूरध्वनीक्रमांक:
०२०२५६२१४४०

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११००७
Website:www.unipune.ac.in
e-mail :coe@unipune.ac.in
sssapp-coord@pun.unipune.ac.in

संदर्भ: परीक्षा समन्वय/१२९६ दिनांक: २३/०९/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था,
अहिल्यानगर, नाशिक व पुणे,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे – ४११००७

विषय :— प्राश्निक, परीक्षक, नियामक/बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक/भरारी पथक जबाबदारीकरिता प्राध्यापकांना कार्यमुक्त करणेबाबत...

महोदय/महोदया,

वरील विषयी कळविण्यात येते की, सन २०२६ मध्ये होणाऱ्या हिवाळी सत्राच्या परीक्षांचे नियोजन सुरू असून सदर परीक्षा केंद्रावर विद्यापीठाकडून बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षकांची तसेच परीक्षासंबधित इतर काम (प्राश्निक, परीक्षक, नियामक) करणे करिता प्राध्यापकांची नेमणूक केली जात आहे.

मागील परीक्षांसाठी प्राश्निक, परीक्षक, नियामक/बहि:स्थ वरिष्ठ पर्यवेक्षक/भरारी पथक सदस्य म्हणून प्राध्यापकांची नेमणूक करण्यात आलेली होती परंतु बरेच प्राध्यापक काही कारणामुळे हजर होत नाहीत, असे निदर्शनास आलेले आहे.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(३)(ब), (४) व (५) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे:**

(४) "विद्यापीठ, संलग्न, संचलित महाविद्यालये, समूह महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या प्रत्येक अध्यापकावर आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्यावर, विद्यापीठाच्या परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन याबाबत परिनियमाद्वारे विहित केल्याप्रमाणे आवश्यक ते सहाय्य आणि सेवा देणे बंधनकारक असेल. याबाबत विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कोणत्याही अध्यापकाने किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्याने कसूर केल्यास, ती गैरवर्तणूक असल्याचे समजण्यात येईल आणि तो कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईसाठी पात्र असेल. याबाबत विद्यापीठाच्या आदेशाचे अनुपालन करण्यात, कोणत्याही संलग्न महाविद्यालयाच्या, संचालित महाविद्यालयाच्या, समूह महाविद्यालयाच्या किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या अध्यापकाच्या किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्याच्या वतीने कसूर झाल्यास, मा. कुलगुरूस, त्यांच्याविरुद्ध, समुचित कारवाई करण्याचा अधिकार असेल, यामध्ये परिनियमांद्वारे विहित करण्यात आले असेल त्याप्रमाणे, अध्यापकाच्या नियुक्तीच्या मान्यतेस स्थगिती देण्यासह शास्ती लादण्याचा समावेश असू शकेल."

(५)	(क) “विद्यापीठाद्वारे किंवा त्याच्या वतीने परीक्षा किंवा विद्यार्थ्यांचे मुल्यमापन किंवा औपचरिक सराव याबाबत सहाय्य किंवा सेवा देण्यासाठी विद्यापीठाच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कसुर केल्याबद्दल आणि विद्यार्थी, प्राश्निक, परीक्षक, नियामक, निर्देशी, अध्यापक यांच्या किंवा परीक्षापूर्व टप्पा आणि परीक्षेनंतरचा टप्पा यांसह किंवा अशा कोणत्याही इतर टप्प्यावर परीक्षा घेण्याशी संबंधित इतर कोणत्याही व्यक्तींच्या चुकांबद्दल अन्वेषण करण्यासाठी व त्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी, परीक्षा व मूल्यमापन मंडळ पाचहून अधिक नसतील अशा व्यक्तींची, ज्या मध्ये एक अध्यक्ष असेल, समिती घटित करील.”

(ख) “अशी समिती, कुलगुरूला तिचा अहवाल व शिफारशी सादर करील. कुलगुरू, हा परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक यांना गैर व्यवहारात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी असलेल्या व्यक्तीविरूद्ध किंवा व्यक्तीविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश देईल आणि संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ हा, कुलगुरूच्या निर्णयाची अंबलबजावणी करण्याची कार्यवाही करील.”

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील वरील तरतूद लक्षात घेता सर्व घटकांनी परीक्षेसंदर्भात त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी विहित वेळेत प्राध्यापकांनी काटेकोरपणे पार पाडणे अपेक्षित व आवश्यक आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या शिक्षकांची विद्यापीठाकडून प्राश्निक, परीक्षक, नियामक/बहिःस्थ पर्यवेक्षक/दक्षतापथक सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येईल, त्यांना संबंधित जबाबदारी पूर्ण करणेकरिता तातडीने आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थेतून नेमणूकीच्या कालावधीसाठी कार्यमुक्त करावे, ही विनंती.

विद्यापीठाकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे कामकाज संलंग्न महाविद्यालयाचे/मान्यता प्राप्त परिसंस्थांचे मा. प्राचार्य/संचालक, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या सक्रीय सहभागामुळेच व्यवस्थित पार पडतात. यापुढेही या घटकांचे सक्रीय सहभाग व सहकार्याची अपेक्षा.

डॉ. राजेंद्र तलवारे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ